Impact Factor : 0.4521 (UIF)
Volume - 3 | Issue - 2 | October – 2016

महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक जडणघडणीत यशवंतराव चव्हाणाचे योगदान

प्रा.डॉ.सुरेश निळकंठराव काळे
इतिहास विभाग प्रमुख, एच.बी.टी.कला व वाणिज्य महाविद्यालय,
नविन सुभेदार, नागपूर.

प्रस्तावना:-



शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे व ते सर्वसामान्यासाठी खूले करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजश्री शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराष्ट्रात शिक्षणाची लोक चळवळ चालविली. त्यातून प्रेरणा घेवून यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात शैक्षणिक चळवळ चालविली.

त्याचे शैक्षणिक विचार पुढीलप्रमाणे, ''शिक्षणाकडे निव्वळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने मी पाहत नाही. माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे एक मूलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्याकरिता आमच्याजवळ मनुष्यबळाशिवाय दुसरे काही साधन नसल्यामुळे आम्हाला या धनाचा विकास करण्यासाठी त्याला शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. ज्याप्रमाणे खेड्यात बिजली (इलेक्ट्रीसिटी) पोहोचविल्याशिवाय शेतीचा विकास होणार नाही, त्याचप्रमाणे आमचा नापीक पडलेला मनुष्यबळाचा हा जो मोठा साधनसंपत्तीचा भाग आहे. त्यात शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवसामर्थ्य निर्माण होणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा माझा स्वतःचा हा असा दृष्टीकोन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे, तसेच शेतीचे औद्योगिकरण करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे, तितकाच महाराष्ट्रात शिक्षणाचा कार्यक्रम महत्वाचा आहे. मग ते शिक्षण कोणत्या प्रकारचे असावे तर या देशातील किंवा महाराष्ट्र राज्यातील समाजोपयोगी साधनांचा वापर करण्याइतकी शक्ती मुलांमध्ये येईल अशा पध्दतीचे शिक्षण मूले घेतात की नाही हे पाहण्याचे काम आता तुम्हाला आम्हाला केले पाहिजे. मी या प्रश्नाला फक्त स्पर्श करतो आणि तो सोडून देतो, परंतु शिक्षणाचा प्रश्न हा महाराष्ट्राच्या आताच्या संदर्भात आयंत क्रांतीकारक प्रश्न आहे असे मी म्हणतो.'' (कॉग्रेस कार्यकर्त्यांचे शिबिर, महाबळेश्वर दि.7 ऑक्टोंबर 1960)

यशवंतरावांना महाराष्ट्रात मातृभाषेतून शिक्षण दिले पाहिजे असे त्यांचे विचार होते. मातृभाषा (लोकभाषा) हीच ज्ञान भाषा झाली पाहिजे यासाठी त्यांनी शासन स्तरावर प्रयत्न केले. ग्रामीण भागात शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर दिला. ग्रामीण भागात त्यांच्याच काळात शिक्षण संस्थाचे जाळे विणल्या गेले. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले.

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांच्या हस्ते इ.सन 1960 मध्ये नेर्ले ता.वाळवा, जि.सांगली येथील संस्थेच्या माध्यमिक विद्यालयाचे, 'कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय' असे नामकरण यशवंतरावांच्या हस्ते झाले. त्यावेळी यशवंतराव म्हणाले, ''मुंबई राज्याचा मुख्यमंत्री झाल्यावर मला जे समाधान झाले होते, त्यापेक्षा अधिक समाधान मला रयत शिक्षण संस्थेचा अध्यक्ष झाल्याने होत आहे.'' असे आस्थापूर्वक भाषण त्यांनी केले होते.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे, 'कमवा व शिका' या धोरणाचा यशवंतरावांनी स्विकार केला. इ.सन 1958–59 मध्ये रयत शिक्षण संस्थेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याचे ठरले. द्विभाषीक राज्याचे मुख्यमंत्री असतांना शासनाच्या वतीने संस्थेला दोन लाख रूपयाची देणगी दिली होती. तसेच संस्थेचे सर्व वस्तीगृह अनुदानित केली होती. संस्थेची नविन कामाची आखणी, कार्यकर्त्यांची भांडणे सोडविणे अशी कामे ते स्वतः करीत असत. संस्थेच्या वार्षिक पूर्तीला दरवर्षी हजर राहत असत.

यशवंतरावांनी कोल्हापूरच्या स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेला मोठी रक्कम दिल्यामुळे त्या संस्थेच्या अनेक इमारती उभ्या राहिल्या. आज ही संस्था पवित्र ज्ञानदानांचे कार्य करीत आहे व हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन उच्च पदावर जात आहे.संस्थेमार्फत पुण्यास शाहू महाविद्यालय उघडले. या महाविद्यालयाला यशवंतरावांनी उरण्येश्वर विभागात मोठी जमीन शासनाकडून उपलब्ध करून दिली.

यशवंतराव चव्हाण जनतेच्या कल्याणासाठी नियमांना वळवून जनतेला त्याचा फायदा पोहचवित असे. त्याचे उदाहरण म्हणजे मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (आताचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) स्थापनेचा निर्णय देता येईल. मराठवाडा महाराष्ट्रात बिनाअट सामील झाला होता. हैदराबाद संस्थानात असल्यानं मराठवाडाचे शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला होता. पुणे विद्यापीठ, नागपूर विद्यापीठ स्थापनेवेळी आवश्यक महाविद्यालये संलग्नतेसाठी निर्माण झाल्यावरच विद्यापीठाची स्थापना झाली होती. पुरेशी महाविद्यालय नसतील तर विद्यापीठाचे उच्च शिक्षण केंद्र कसे काढता येईल. असा शिक्षण खात्याचा रास्त व नियमाचा मुद्दा होता. यशवंतरावांना मराठावाड्यासाठी तर 1958 मध्ये विद्यापीठ काढायचे होते. महाविद्यालय होती अवघी नऊ आणि आवश्यक होती किमान साठ. यशवंतरावांनी नियम मराठवाड्यासारख्या मागास विभागासाठी शिथिल केले. आधी विद्यापीठ स्थापन केले आणि मग महाविद्यालय काढण्याची प्रेरणा मराठवाड्यातील अनेक नेत्यांना दिली. त्यामुळे मराठवाड्यात अवघ्या आठ महिन्यात 60 महाविद्यालयं निघाली. मराठवाड्याकरिता स्वतंत्र विद्यापीठाची शिफारस करून विद्यापीठाची स्थापना 23 ऑगस्ट 1959 रोजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाली.

यशवंतरावांनी महाराष्ट्रात औद्योगिक – कृषी पारूपाच्या अमंलबजावणीसाठी, मनुष्यबळ महत्वाचे आहे व त्यामध्ये कौशल्य विकसित करून त्याला प्रक्रियेत सामावून घेतले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. हे विचार त्यांनी 1960 च्या दशकात मांडलेले होते ते फार उपयुक्त होते. हा विचार राष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षण, तंत्र शिक्षणाचा आग्रह यशवंतरावानी धरला होता. दक्षिण महाराष्ट्रासाठी यशवंतरावांनी शिवाजी विद्यापीठ (आताच छत्रपती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) स्थापन करण्याचा निर्णय यशवंतरावांनी आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात घेतला व या विद्यापीठाची स्थापना 18 नोव्हेंबर 1962 रोजी राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन यांचा हस्ते झाली. आज हे विद्यापीठ यशवंतरावांची स्मृती जागी ठेऊन यशस्वीरित्या ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे.

वरील दोन्ही विद्यापीठाच्या स्थापने मागे यशवंतरावांनी मराठवाडा शैक्षणिक विस्ताराला चालना दिली तसेच ग्रामीण भागात शैक्षणिक वातावरण निर्माण झाले. शिक्षण हे समाज परिवर्तन साधन आहे. परतु ते आर्थिक परिवर्तनाचे साधन बनले पाहिजे. हा यशवंतरावांचा विचार भविष्यात उपयुक्त ठरला.

यशवंतरावाचे शिक्षण विचार उदारमतवादी होते. त्यासाठी त्यांनी शासन स्तरावर जीवनभर संघर्ष केला. महाराष्ट्रात उच्च शिक्षणासोबत तंत्र शिक्षणावर भर देऊन तंत्रशिक्षण, अभियांत्रिकी महाविद्यालय (इंजिनिअररिंग कॉलेज) सुरू केलेत. तसेच कृषी शिक्षणावर भर देऊन कृषि महाविद्यालय स्थापन केले. त्यांच्याच काळात पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला व महात्मा फुले विद्यापीठ, राहूरी स्थापन केले. महाराष्ट्रात कृषी शिक्षणाची व्यवस्था झाली. त्यांच्याच काळात अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुवैद्यकिय, कायदा इत्यादी विषयाची महाविद्यालय ठिकठिकाणी निघाली. सरकारी खात्याची पुनर्रचना करून आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीयांना मोफत शिक्षण, शिक्षण सुविधेत वाढ, शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. सातारा सैनिक शाळा स्थापना, आदिवासी आश्रमशाळा, क्रिडा संस्था स्थापन केल्या. शैक्षणिक वसतीगृह स्थापन केले. इत्यादी अनेक सामाजिक व शैक्षणिक संस्था स्थापन करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले.

यशवंतरावांनी महाराष्ट्रात अनेक क्षेत्रातील तज्ञ मंडळीला सोबत घेऊन महाराष्ट्राच्या प्रगतीला वेग दिलेला दिसतो. सामाजिक समस्यांवर अधिक संशोधन झाले पाहिजे असा यशवंतरावांचा आग्रह होता. ते आपल्या एका साहित्य संमेलनातील भाषणात म्हणतात. ''इतिहासाचे सर्वांगीण अध्ययन व संशोधन झाले पाहिजे. महाराष्ट्रातील अनेक थोर पुरूषांच्या जीवनाचा संशोधन अभ्यास करणारे ग्रंथ, त्यांच्या चरित्रसाधनांची जमवाजमव यात विद्यापीठांनी लक्ष घालावयास हवे. महाराष्ट्रातील सहा विद्यापीठात विषयावर वाटणी करून अध्यासने निर्माण करून योजनापूर्वक हे काम करावे लागेल.''

यशवंतरावांचा हा विचार आजही महाराष्ट्रात जसाच्या तसा राबविण्याची आवश्यकता आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आजही महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात संशोधना बाबतीत काय स्थिती आहे व किती अध्यासने रिक्त आहेत, हे पाहिल्यास यशवंतरावांच्या बौध्दिक समृध्दीची, प्रश्न समोर ठेऊन त्यावर योग्य प्रशासक या नात्याने राजकारणाचा गुंता न करता त्या प्रश्नांची उकल करण्याच्या पध्दतीची माहिती होऊ शकते. वरील सर्व

कार्यातून त्यांच्यातील मानवतावादी, जनसामान्यावर प्रेम करणारा, असामान्य प्रतिभाशाली समजासुधारक दिसून येतो.

संदर्भ सूची

1) तायवाडे शरयू व देशमुख अनंत, 'यशवंतराव चव्हाण : एक जाणते नेतृत्व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे शिल्पकार', स्मरनिका, 2012
2) लोखंडे नारायण मेधाजी, 'महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था', (महाराष्ट्र शासन) स्मरणिका 2012
3) पाटील आप्पासाहेब भाऊराव, 'मी पाहिलेले यशवंतराव' महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळ', मुंबई.
4) चव्हाण रा.ना., 'यशवंतराव चव्हाण यांचे समाजकारण', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे प्रथम आवृत्ती 2010
5) नाईकवाडे अशोक, 'महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण', गौरवग्रंथ विद्याभारती प्रकाशक, लातूर.
6) यशवंतराव चव्हाण, 'ऋनानुबंध', प्रेस्टिज प्रकाशन, 1986, पूणे.